फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १०/२०१७

प्रिया वि. तेजस

निशाण क्र. ३८ लगत

**उलटतपास गैरअर्जदार तर्फे श्री. के. के. मराठे यांचे मार्फत सुरु.**

१. सन २०११ ते २०१७ या कालावधीत मी गैरअर्जदार क्र. १ सोबत राहत होते. सदर कालावधीत घरातील कामे मी व माझी सासु मिळुन दोघी करत होतो. सदर कालावधीत माझ्या म्हणण्याप्रमाणे मी, गैरअर्जदार, दोन मुली व माझा भाऊ असे एकत्रात राहत होतो. आम्हांला सर्वाना महिन्याला तांदुळ, डाळ व गहु प्रत्येकी १५ किलो धान्य लागत असे. हे म्हणणे खरे नाही की, सदर धान्य राशन दुकानातुन येत होते. सदर धान्य आणण्यासाठी किती खर्च लागत होता हे मला सांगता येणार नाही. धान्य आणण्यासाठी मी स्वतः जात होते. त्या कालावधीतील धान्याचे दर मला सांगता येणार नाहीत. मी स्वतः कपडे हाताने धुवत होते. मुली व मला त्यावेळचा दरमहा किती खर्च लागत होता हे मला आता सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर कालावधीत मी चाळीमधील खोलीत राहत होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर खोली ही भाडयाची होती. हे म्हणणे खरे आहे की चाळीमधील सार्वजनिक शौचालय होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर कालावधीत गैरअर्जदार याने घरातील सुखवस्तु घेतलेल्या नव्हत्या. हे म्हणणे खरे आहे गैरअर्जदाराचे सुखवस्तु घेण्याची आर्थीक परस्थिती नव्हती. त्यावेळे दरमहा कीती वीज बील येत होते हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी गैरअर्जदार क्र. १ याला जास्त मेहनत करुन जास्त पैसे कमविण्यास सांगत होते. हे म्हणणे खरे आहे की, ज्या कालावधीत मी गैरअजदार सोबत राहत होते

त्या कालावधीत मला व मुलीला दरमहा दिड ते दोन हजार रुपये खर्च लागत होता अशा आर्थिक परस्थितीत राहत होते.

२. हे म्हणणे खरे आहे की, माझे गैरअर्जदार यांचे लग्न ठरताना गैरअर्जदार क्र. १ हा गरीब असला तरी चालेल असा विचार मी व माझ्या आईने केला होता. या अनुषंगाने आमचा विवाह झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, चाळीमध्ये गरीबीच्या व कमी उत्पन्न असलेल्या इसमासोबत रहावे लागेल. हे म्हणणे खरे आहे की, पतीसोबत राहत असताना येणा–या खर्चाच्या तीनपट पोटगीची मी मागणी केलेली आहे.

३. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार क्र. १ सध्या कोठे काम करता व त्याला कीती पगार मिळतो हे मला माहित नाही. गैरअर्जदार क्र. १ सध्या नोकरी करतो किंवा नाही, हे मला माहिती नाही. गैरअर्जदार क्र. १ याची नुकसान भरपाई रुपये १,००,०००/– देण्याची परस्थिती आहे किंवा नाही हे मला सांगता येणार नाही.

४. माझ्या म्हणण्याप्रमाणे गर्भपाताचे घटना सन २०१२ मधील एकाच वर्षामधील आहेत. गर्भपाताबाबत उपचार कोणत्या डॉक्टरांकडे घेतले हे मला माहीत आहेत. सदर बाब अर्जात व पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रात नमुद करण्यास कोणती अडचण नव्हती. उपचार घेतलेबाबतचे कागदपत्र माझेकडे आहेत. सदर कागदपत्र मी माझ्या विधिज्ञांना दाखविले होते. सदर कागदपत्र न्यायालयात दाखल करणे मला सहज शक्य होते. सदर दस्तऐवज दाखल न करण्यास कोणतेही कारण नाही. गर्भपाताच्या घटनेवर न्यायालयाने तोंडी शब्दाने विश्वास ठेवावा असे माझे म्हणणे आहे. गर्भपाताची व कानात तेल टाकलेची व कान फोडल्याबाबतची घटना व त्यामुळे मला बेहरेपणा आला

पोलिसांनी दिलेल्या तक्रारीत सांगणेस मला कोणतीही अडचण नव्हती. मी माझे पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रातील पान क्र. ३ मधील ओळ क्र. २ मधील नमुद घटना ही सार्वजनिक ठिकाणी घडली असे माझे म्हणणे आहे. सदर घटना चाळीतील लोकांनी पाहीली होती. सदर घटना अशी शबानाची आई व मद्रासी अण्णा यांनी पाहीले होते, परंतु त्यांची नावे मला सांगता येणार नाही. सदर लोकांची साक्षी मी नोंदवु शकत नाही. साक्षीदार स्वतः हून सांगतो की, सदर लोक हे गैरअर्जदार क्र. १ च्या शेजारी राहतात त्यामुळे ते त्यांच्या विरुध्द साक्ष देणार नाहीत.

५. ई. एस. आय मॉडेल हॉस्पीटल मध्ये उपचार घेतल्याचे कागदपत्र माझ्याकडे आहेत. सदर कागदपत्र हजर करण्यास मला कोणतीही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझा कान फुटला होता व मला ऐकू येत नाही असा कोणताही शासकीय दस्त माझ्याकडे नाही. मारहाणीमुळे माझा कान फुटला असे दाखविणारे वैदयकिय प्रमाणपत्र माझ्याकडे नाही. कान फुटल्याच्या घटनेबाबत पोलिसांत तक्रार दिली होती. सदर तक्रारीची प्रत न्यायालयात हजर करणेस कोणतेही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी कथन केल्याप्रमाणे कान फुटल्याची कोणतीही घटना घडली नसल्याने मी तसे दस्त दप्तरी दाखल केलेले नाहीत.

६. हे म्हणणे खरे नाही की, माझा भाऊ रघुनाथ यामुळे सन २०१५–१६ मध्ये माझी तौफिक खान याच्याशी ओळख झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, तौफिक व माझ्या भेटीगाठी वाढू लागल्या व त्यामुळे गैरअर्जदार माझ्यावर नाराज होता. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार क्र. १ हा रघुनाथला म्हणत होता की तुझ्यामुळे

तौफिक आमच्या संसारात आला,तु येथुन निघुन जा. हे म्हणणे खरे नाही की दि. १८.०३.२०१७ रोजी रघुनाथ याने गैरअर्जदांना शिविगाळ केली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर रागातुन मी गैरअर्जदारा विरुध्द बांगुर नगर पोलिस ठाण्यात खोटी फिर्याद दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, मला व तौफिकला दुचाकीवरुन फिरताना गैरअर्जदार क्र. १ याने पकडले होते व त्यावेळी आम्ही गैरअर्जदार क्र. १ यांच्या अंगावर मोटार सायकल घालून त्याला मारण्याचा प्रयत्न केला.

७. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार क्र. १ हा आज देखील मला नांदविण्यास न्यायला तयार आहे परंतु माझी त्यासोबत नांदण्याची ईच्छा नाही. तसेच त्याला घटस्फोट देण्याची देखील तयारी नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला गैरअर्जदारकडून पोटगी हवी म्हणून मी घटस्फोट देण्यास तयार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रात व अर्जात कथन केल्याप्रमाणे मारहाणीच्या कोणत्याही घटना घडलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, तीन वेळा गर्भपात केल्याचे तसेच गैरअर्जदार क्र. १ यांने माझा कान फोडला व त्यामुळे मला ऐकू येत नाही हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार क्र. १ हा मला जीव जाई पर्यंत मारहाण करीता होता व बळजबरीने शाररीक संबंध ठेवत होता हे मी खोटे सांगत आहे.

८. मार्च २०१७ नंतर एकदाही माझे व गैरअर्जदार क्र. १ चा संर्पक किंवा कोणतेही संभाषण झालेले नाही. मार्च २०१७ मध्ये मुंबई येथे माझे व गैरअर्जदार क्र. १ चा शेवटचा संर्पक वा संभाषण झाले होते. मी गावाकडे आल्यानंतर व माझा व

गैरअर्जदार क्र. १ चा कोणतेही संभाषण झालेले नाही. माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रामध्ये परीच्छेद क्र. ९ मध्ये गावी आल्याचा मजुकर नमुद का केला याचे कारण मी सांगु शकते. हे म्हणणे खरे नाही की परीच्छेद क्र. ९ मधील मजकुर माहित असतानाही मी वरील उत्तरे जाणीवपुर्वक दिलेली आहेत. हे म्हणणे खरे आहे की शपथेवर खोटी साक्षी दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, या न्यायालयात अर्ज दाखल करण्यासाठी परिच्छेद क्र. ९ मधील मजकुर खोटा नमुद केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटा मजुकराचा अर्ज व पुराव्याच्या प्रतिज्ञातील खोटी साक्ष देत आहे.

फेरतपास पुर्ण

उलटतपास तहकूब

श्रवणोत्तर स्विकृत

सही/-

दि.०९/०१/२०२३.

दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड

मध्यंतरानंतर उलटतपास पुढे सुरु.

१५ हापूस कलमांची लागवड व त्याचे संगोपना संदर्भात मला माहिती नाही. दावा मिळकत ब मधील क्षेत्रामध्ये मी १०० हापूस कलमांची लागवड केली, विहीरीचे खोदकाम केले हे दाखविण्यासाठी दाव्यात कोणताही दस्त दाखल केलेला नाही. खरेदी केलेल्या क्षेत्रामध्ये वरेरी ग्रामपंचायत घर क्र. ४३५ चे बांधकाम केले हे दाखवण्यासाठी सातबारा उतारा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही मी वादपत्राच्या परिच्छेद क्र. ४ मध्ये नमूद केलेली कोणतीही बाब केलेली नाही.

१६ हे मला माहिती नाही की प्रतिवादी क्र. १ ते ८ यांनी आपसात वाटपाची मागणी केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ ते ८ यांचा दावा मिळकतीमध्ये किती हिस्सा आहे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ ते ८ यांच्यात आपसात वाटप करुन मागण्याचा मला कोणताही अधिकार नाही. दावा मिळकत ब मधील ८० गुंठे क्षेत्राच्या चतुःसिमा नमुद करण्यास मला कोणतीही अडचण नव्हती. दावा मिळकत ब मधील ८० गुंठे क्षेत्राच्या चतुःसिमा मला माहिती आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत ब मधील ८० गुंठे क्षेत्र कोणते याची मला माहीती नाही.

१७ हे म्हणणे खरे नाही की, रे. मु. नं. ४१/२००६ मधील आदेशाची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी संपुर्ण खोटया मजकूराचा दावा केला असून त्यातील मागण्या देखील खोटया व बेकायदेशीर आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी संपुर्ण खोटया मजकूराचा सरतपास दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

**प्रतिवादी क्र. ३ यांना वेळोवेळी पुकारले असता गैरहजर, कामकाज तहकुबीचा अर्ज नाही. प्रतिवादी क्र. ९ व १० तर्फे दावा एकतर्फा असल्याने प्रतिवादी क्र. ३, ९, १० यांच्यातर्फे साक्षीदाराचा उलटतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

सही/-

दि.०९/०१/२०२३. दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड